


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ८२ वा | गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# देशात राजकीय भूकंप होणार? संपूर्ण देश रस्त्यावर येईल !

## 'देशाला पंतप्रधानच नसेल ! पुढील ५ महिन्यांत देशात मोठी गडबड'

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** अल्पवयीन मुलींवरील अत्याचार प्रकरणातील गुन्हेगार जेफ्री एपस्टीन याच्यासोबत केंद्रीय मंत्रिमंडळातील एका मंत्र्याचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर आता सरकारविरोधात आक्रमक प्रतिक्रिया उमटत आहेत. मुंबई प्रेस क्लब इथं पत्रकारांशी संवाद साधताना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मोठी भविष्यवाणी केली आहे. "पुढील काही दिवसांत अनेक गोष्टी बाहेर येतील. हे आता थांबणार नाही. सरकार चुकांवर चुका करत राहणार. आगामी काळात संपूर्ण देश रस्त्यावर आला तरी मला आश्चर्य वाटणार नाही. नीटचं आंदोलन झालं, आता निवडणूक आयोगाविरोधात लोक रस्त्यावर आहेत. नीटच्या आंदोलनात उतरलेल्या सर्वांनीच नीटची परीक्षा दिलेली नव्हती. पण लोकांमध्ये विविध मुद्द्यांवरून सरकारविरोधात राग आहे आणि हा राग व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ शोधले जात आहे," असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

पुढच्या दोन-पाच महिन्यांत काहीतरी गडबड होईल, अशी शंका त्यांनी व्यक्त केली आहे. त्याचबरोबर देशात पुन्हा मतपत्रिकांवरच मतदान व्हायला हवी अशी आग्रही भूमिका त्यांनी मांडली.

**मतपत्रिकांवर निवडणुका घ्या**

राज ठाकरे म्हणाले, "२०१८ पासून मी बॅलेट पेपरवर निवडणूक व्हावी अशी मागणी करत आलो आहे. त्यासाठी मी अनेक राजकीय नेत्यांना भेटलो होतो, तसंच त्यावेळच्या निवडणूक आयुक्तांना दिल्लीला जाऊन मी हा विषय बोललो होतो. त्यावेळी मी काय बोललो हे कोणाला समजलं नव्हतं पण आता ते समजतंय. निवडणुकीत पारदर्शकता असायला हवी, ज्या व्यक्तीला मी मतदान करतो याचं समाधान मला मिळालं पाहिजे. मी त्याच व्यक्तीला मतदान केलं आहे, हे कळलं पाहिजे"

जर आपल्या आजुबाजूचे देश पाहिले तर लक्षात येईल की, सर्वच ठिकाणी मतपत्रिकांवर मतदान होत आहे. कुठेही मशिन्स वापरली जात नाहीत. अफ्रिकेशतील तीन-चार देश आहेत आणि त्यात भारतही आहे जिथं मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक मशिन वापरली जातात. फ्रान्समध्ये केवळ एका व्यक्तीच्या तक्रारीवरुन तिथं इव्हीएम ही गोष्ट रद्द झाली आणि ते मतपत्रिकेवर आले. आख्ख जग मतपत्रिकेवर आहे तर मग भारतातच ईव्हीएम कशासाठी पाहिजेत, असा सवालही त्यांनी केला.

"महाराष्ट्रात सरकारने नुकताच ३०० हून अधिक तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. अजून परिस्थिती खराब होणार आहे. पुढे-पुढे अन्नधान्याच्या टंचाईपासून विविध समस्या निर्माण होतील आणि हे सगळं सरकारला झेपण्यासारखं नाही. मी मध्ये कोणाशी तरी बोललो पण होतो की, एक असा कालावधी येईल, जेव्हा या देशाला पंतप्रधानच नसेल," असा अंदाजही राज ठाकरे यांनी व्यक्त केला.

**मतमोजणीला उशीर झाल्यास अडचण नाही - राज ठाकरे**

विधानसभा, लोकसभेच्या निवडणुकीत ईव्हीएम वापराचं कारण 'मतमोजणी लवकर होते' असं दिलं जातं. पण आम्हाला निकालच उशीरा मिळतो त्याचं

### राज ठाकरेंच्या विधानाने खळबळ!



काय करायचं मतपत्रिकेवर निवडणूक घेऊन जर निकाल जाहीर व्हायला चार दिवस लागणार असतील तर घाई कोणाला आहे? १९९५च्या विधानसभा निवडणुकीत १२ फेब्रुवारीला मतदान झालं होतं आणि १२ मार्चला निकाल लागला होता. त्यामुळं काय फरक पडला? आताही लोकसभेच्या निवडणुका विविध टप्प्यात होतात आणि शेवटी निकाल काही दिवसांनीच लागतो, त्यामुळं त्याची अडचण असायचं कारण नाही, असा दाखलाही यावेळी राज ठाकरे यांनी आपल्या भूमिकेला स्पष्टता यावी यासाठी केला.

**पुढच्या पाच महिन्यात गडबड होईल - ठाकरे**

"पुढच्या पाच महिन्यांत या देशात काहीतरी मोठी गडबड होईल, एवढं निश्चित" अशा शब्दांत राज ठाकरेंनी सध्या विरोधकांकडून सुरु असलेल्या रिजीम चेंजच्या मुद्द्यावर भाष्य केलं. मोदींच्या मंत्रीमंडळातील एका मंत्र्याचा एप्स्टिनसोबतचा फोटो बाहेर आला आता यापुढे खूप गोष्टी बाहेर येणार आहेत, हे आता थांबणार नाही. सरकार चुकांवर चुका कर राहणार पण ही गोष्ट आता थांबणार नाही. पुढच्या काही महिन्यांत आख्खा देश रस्त्यावर आला तर मला आश्चर्य वाटणार नाही. येत्या काळात दुष्काळाची भीषण परिणाम दिसायला लागतील, यामध्ये अन्न-धान्याची टंचाई निर्माण होईल जे सरकारलाही झेपणारं नसेल. एवढंच होणार नाही पण इतरही अनेक गोष्टी होतील. याच पार्श्वभूमीवर मध्येच एखादी अशी वेळ येईल जेव्हा या देशाला पंतप्रधानाच नसेल, असंही यावेळी राज ठाकरे म्हणाले.

दरम्यान, राज ठाकरे यांनी यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांचाही समाचार घेतला. "२०१४ साली देशात भाजपची जी सत्ता आली ती नरेंद्र मोदी यांच्यामुळे आली. ती आपल्यामुळे आली असं संघाने समजू नये. त्यामुळे आताही या सत्तेचं काय करायचं हे देशातील जनता आणि मोदी हे पाहून घेतील," असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

**भाजप मागचे दिवस विसरलं का?**

देशात अराजकता पसरवण्याचं काम सुरु आहे, या सरकारच्या आरोपाला उत्तर देताना राज ठाकरे म्हणाले की, "शांततेत आंदोलन करणाऱ्या मुलांवर तुम्ही लाठीचार्ज केला, पोलिसांच्या वेळात तुमच्या पक्षाचे लोक होते त्यात मुलांचा काहीच दोष नव्हता. भाजप मागचे दिवस विसरलं आहे का?" उद्यापासून त्याचं प्रदर्शन भरवा, अशी टिप्पणीही राज ठाकरे यांनी पक्षाच्या नेत्यांकडं केली. तसंच खरी लोकशाही ही अमेरिकेत आहे आपल्याकडं नाही, अशी टिप्पणीही त्यांनी केली.

"या देशात लोकशाही कुठे आहे? अमेरिकेत जे मराठी संमेलन असतं, त्यात मी सांगितलं होतं की, खरी लोकशाही तुम्हाला बघायची असेल तर ती अमेरिकेत आहे. ऑस्करच्या व्यासपीठावर येऊन अभिनेते ट्रम्पविरोधात बोलतात, तरी त्यांच्या चित्रपटांवर बहिष्कार नाही टाकले जात. समीर भाटियाने आता एक डॉक्युमेंट्री केली तर ती हटवण्यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. आपल्या कृतीचा भविष्यात काही परिणाम होईल, काळ सोकवणार नाही ना, याचा विचार प्रत्येक सत्ताधारी पक्षाने करायला हवा," असं राज ठाकरे म्हणाले.

ईव्हीएमविरोधातील भूमिका, सरकारवरील टीका, आंदोलनांबाबत उपस्थित केलेले प्रश्न आणि आगामी पाच महिन्यांत मोठ्या घडामोडी घडण्याचा अंदाज यामुळे राज ठाकरे यांच्या पत्रकार परिषदेची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. देशातील सध्याची परिस्थिती, वाढता जनक्षोभ आणि सत्ताधाऱ्यांसमोरील आव्हाने यांचा संदर्भ देत त्यांनी सरकारला लक्ष्य केले.

आता खरा प्रश्न असा आहे की, राज ठाकरे यांनी व्यक्त केलेला हा अंदाज प्रत्यक्षात उतरतो का? आगामी काही महिन्यांत देशाच्या राजकारणात कोणते बदल घडतात आणि केंद्र सरकार या आव्हानांना कसे सामोरे जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# 'एकनाथ शिंदेंनी माझ्या नावाने भाजपकडून 500 कोटी घेतले...'

## मनोज जरांगेंचा मोठा गौप्यस्फोट

**जालना (कटूसत्य वृत्त):-** मनोज जरांगे पाटील यांनी नारायण गडावरील दसरा मेळाव्यात मोठा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत गौप्यस्फोट केला. ते म्हणाले, "मी उपोषणाला बसलो असताना मला सातव्या आठव्या दिवशी कळालं की, एकनाथ शिंदेसाहेबांनी भाजपकडून 500 कोटी रुपये घेतले आणि मनोज जरांगे पाटील याला दिले.

त्यांचे पुत्र श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते हे पैसे दिले." त्यांच्या या वक्तव्यामुळे चर्चांना उधाण आलं आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले, "एका नेत्याने मला याविषयी सांगितले,माझ्याकडे पुरावे आहेत. शिंदेसाहेब माझ्या नावाने तुम्ही पैसे घेतले. भाजपच्या नेत्यांना तुम्ही मनोज जरांगेंना पैसे हवेत म्हणून सांगून हे पैसे तुम्ही घेतले. हे खरं आहे की खोटं आहे याचं उत्तर मला द्या. आज दसरा मेळाव्यात द्या नाहीतर उद्या संध्याकाळ पर्यंत





द्या," असं आवाहन मनोज जरांगेंनी एकनाथ शिंदेंना केलं आहे.

तर याबाबत आपणाला एका नेत्याने सांगितलं असून माझ्याकडे याबाबतचे पुरावे आहेत, असा दावाही जरांगेंनी केला. ते म्हणाले, "शिंदेसाहेब माझ्या नावाने तुम्ही पैसे घेतले. भाजपच्या नेत्यांना तुम्ही मनोज जरांगेंना पैसे हवेत म्हणून सांगून हे पैसे तुम्ही घेतले. हे खरं आहे की खोटं आहे याचं उत्तर मला द्या. आज दसरा मेळाव्यात द्या नाहीतर उद्या संध्याकाळ पर्यंत द्या. माझ्याविषयी काही गोष्टी कळल्यानंतर त्यावर मी पांघरून टाकायला हवे. मात्र, मी तसे करणार नाही.

'दिल्लीच्या भाजपच्या काही नेत्यांना, महाराष्ट्राच्या भाजपच्या काही नेत्यांना शिंदेसाहेब तुम्ही सांगितले की, जरांगे पाटलांना 500 कोटी द्यायचे आहेत. आता तुम्ही खरं सांगा भाजपकडून 500 कोटी घेऊन मला दिले हे भाजपच्या नेत्यांना तुम्ही सांगितले का? श्रीकांत भैय्या शिंदे यांच्या हाताने 500 कोटी पोहोचले, असे तुम्ही भाजपला सांगितले आणि तुम्ही जर मला दिले नसतील तर मग भाजप तुम्हाला संपवतंय की तुम्ही मला संपवताय याचा छडा लावल्याशिवाय मी राहणार नाही, असं जरांगे म्हणाले.

**जरांगे पाटलाला कसा मारायचा?**

दरम्या, यावेळी जरांगेंनी त्यांना मारण्यासाठी प्लॅन सुरू असल्याचा मोठा आरोप केला. ते म्हणाले, "इतकी भयंकर गुप्त चर्चा आहे की, जरांगे पाटीलला कसा मारायचा? त्याच्यात एका माजी मुख्यमंत्र्याचं नाव आहे. तो बाळासाहेब ठाकरे साहेबांना म्हटला बाळासाहेब ठाकरे माझा बाप आहे. त्यात असली कमेंट आहे ती बघितली तर तो उद्याच पक्ष सोडेल. तीस चाळीस मिनिटांची भयंकर चर्चा आहे. ती जर तुम्ही ऐकली तर म्हणाल आपल्या जरांगे पाटलाला किती वेदना दिल्यात यांनी. आणि हे अडीच वर्षानंतर उघडं पडलं आहे.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मनोज जरांगे पाटील यांच्या 500 कोटींच्या आरोपांवर आमचे प्रवक्ते, नेते बोलताहेत. कुणाला 500 कोटी दिलेही नाही आणि घेतलेही नाही. ते देण्याचा प्रश्नही नाही. बरं, या ज्याकाही आधारावर जरांगे पाटील हे बोलताहेत, त्याची अगोदर शहानिशा त्यांनी करायला पाहिजे होती. शहानिशा करुनच त्यांनी बोलायला पाहिजे होतं असंही त्यांनी म्हटलं.

तसेच मनोज जरांगे यांच्याकडे 500 कोटींच्या जे काही पुरावे असतील, तेही त्यांनी संबंधित यंत्रणांकडे द्यावेत. त्याची चौकशी झाली पाहिजे. दुध का दूध आणि पाणी का पाणी झालं पाहिजे. एवढंच याप्रसंगी मी सांगतो. एकनाथ शिंदे यांना महाराष्ट्र,तसेच संपूर्ण देश ओळखतो,असंही शिंदे यांनी यावेळी सांगितलं.

**खरं-खोटं सिद्ध करा**

तसंच जरांगे यांनी एकनाथ शिंदेंना खरं-खोटं सिद्ध करून दाखवण्याचं आवाहन केलं आहे. ते म्हणाले, "तुम्ही भाजप नेत्यांना खोटं बोलून मला 500 कोटी द्यायचे म्हणून पैसे का आणले? आणि जर तुम्ही आणले नसतील तर आणले नाही असं सांगा. तुम्ही खरं सांगा किंवा खोटं सांगा दोन्हीत सामना करायची माझी तयारी आहे.

तुम्ही आजच्या दसऱ्या मेळाव्यात उत्तर द्या. नाही तर उद्या संध्याकाळपर्यंत सांगा, पण आता मी याच्या मुळाशी जाणार आहे, मी फक्त उत्तर मागितलं आहे. ते त्यांच्या त्यांच्यात म्हणतायत "श्रीकांत शिंदेंनी माझ्याकडे पैसे दिले," आणि हे मला आता कळतंय, असंही जरांगे यावेळी म्हणाले. तर जरांगे पाटलांच्या या आरोपांमुळे आता राज्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे.




# पदवीधरांचा सन्मान आणि रोजगाराचा ध्यास; हर्षदा देशमुख जाधव यांचे पदवीधरांना आवाहन

**पुणे (कटूसत्य वृत्त) :-** पुणे विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ साठी महाविकास आघाडी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या अधिकृत उमेदवार सौ. हर्षदा देशमुख जाधव यांनी पदवीधर मतदारांना मतदानाचे आवाहन केले आहे. पदवीधरांचा सन्मान, तरुणांना रोजगाराच्या संधी, स्पर्धा परीक्षांमधील पारदर्शकता आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण या मुद्द्यांना प्राधान्य देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.



आजच्या काळात उच्चशिक्षित तरुणांसमोर रोजगार, कौशल्यविकास आणि स्पर्धा परीक्षांमधील पारदर्शकतेसह अनेक आव्हाने आहेत. या प्रश्नांना विधान परिषदेत प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे हर्षदा देशमुख जाधव यांनी म्हटले आहे. पदवीधरांच्या हक्कांसाठी आवाज उठविण्यासोबतच युवकांच्या प्रश्नांवर ठोस भूमिका मांडण्याचा आपला प्रयत्न राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

'पदवीला मान, कौशल्याला स्थान, महिलांना सन्मान' हा विचार केंद्रस्थानी ठेवून पदवीधरांच्या अपेक्षा आणि समस्या शासनापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला आहे. यासाठी पदवीधर मतदारांनी आपले मोलाचे सहकार्य, आशीर्वाद आणि मार्गदर्शन द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

**२३ ऑक्टोबरला मतदानाचे आवाहन**

पुणे विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी शुक्रवार, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार असल्याचे उमेदवारांच्या आवाहनात नमूद करण्यात आले आहे. मतपत्रिकेवरील अनुक्रमांक ३ समोरील रकान्यात पसंती क्रमांक १ नोंदवून आपल्याला विजयी करावे, अशी विनंती सौ. हर्षदा देशमुख जाधव यांनी पदवीधर मतदारांना केली आहे. पदवीधरांचे प्रश्न, तरुणांचे भविष्य आणि महिलांच्या सन्मानासाठी काम करण्याची संधी द्यावी, असे आवाहन करत त्यांनी निवडणुकीत पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे.




# सोलापूरात शिक्षक मतदारयादीत मोठा घोळ ! ११ शिक्षक बोगस

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिक्षक आमदारकीसाठी प्रसिद्ध झालेल्या मतदारयादीत ११ जण शिक्षक नसताना मतदार यादीत असल्याचे समोर आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशावरून त्या सर्वांच्या अर्जांची पडताळणी करण्यात आली.

त्यावेळी ते अकरा जण शिक्षक नसल्याचे उघड झाले. बार्शीतील गटशिक्षणाधिकारी गजानन बाजड यांच्या फिर्यादीवरून ११ जणांविरूद्ध बार्शी शहर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

शिक्षक आमदारकीसाठी सध्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. २२ सप्टेंबरला शिक्षक व पदवीधर मतदारांची



यादी प्रसिद्ध झाली आहे. यात ११ मतदार शिक्षक नसतानाही मतदारयादीत असल्याचे वृत्त समाजमाध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत पोचले. निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांच्या आदेशानुसार झोनल अधिकारी बाजड यांनी संशयितांच्या अर्जांची पडताळणी केली.

**'हे' आहेत ११ शिक्षक**

जोतिबाची वाडी येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात मोहन बाळासाहेब भोसले (रा. जोतिबाची वाडी), अक्षय श्रीहरी चव्हाण (रा. जवळगाव नं.२, बार्शी), तुषार मोहन भोसले (रा. रूई, ता. बार्शी), तसेच पेहे येथील एम. जी. गुरुकुल प्रशालेत स्वप्निल अंबरूषी कापसे, रोहित बाबासाहेब कापसे, पृथ्वीराज बाळासाहेब कापसे, शुक्राचार्य शाहूराजे बाबर, सुरज युवराज बाबर, सुदेश नवनाथ कापसे, अभिजित बापू डिसले व संतोषी किशोर धेंडे हे शिक्षक नसल्याचे दोन्ही शाळांच्या मुख्याध्यापकांनी प्रशासनाला कळविले. त्यावरून ११ जणांनी बनावट प्रमाणपत्रे सादर करून शिक्षक मतदार यादीत नावे समाविष्ट केल्याचे सिद्ध झाले. त्यावरून संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## संपादकीय

# नवरात्रात देवीपूजन, गर्भात मात्र मुलींचा बळी !

महाराष्ट्रात उत्साहात नवरात्रीच्या नऊ दिवसांत नऊ रूपांतील देवीचा जागर सुरू आहे. या पार्श्वभूमीवर, याच महाराष्ट्रात गेल्या तीन वर्षांत मुलींच्या घटत्या संख्येविषयी आलेली आकडेवारी धक्कादायक असली तरी अपेक्षित होती. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (एनएफएचएस-५) आणि एसआरएसच्या ताज्या अहवालानुसार महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये जन्माच्या वेळचे लिंग गुणोत्तर ८५०पेक्षाही खाली घसरले आहे; तर राज्याची सरासरी ९१५च्या आसपास रेंगाळते आहे. म्हणजे निसर्गाने ९५० मुलींमागे १००० मुलगे असे प्रमाण ठेवले असताना आपण कृत्रिमरीत्या १०० मुली गर्भातच गायब करत आहोत.

हा विरोधाभास नाही, हा दांभिकपणा आहे. याबाबतचा इतिहास विसरता कामा नये. गर्भलिंग निदानाविरुद्ध कायदा करण्यामध्ये देशात महाराष्ट्र पहिला आहे. सन १९८८मध्ये प्रथम महाराष्ट्र शासनाने महिला संघटनाच्या आग्रहामुळे गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा मंजूर केला. मग १९९४मध्ये केंद्राने पीएनडीटी कायदा केला. महाराष्ट्रातील 'मासूम' आणि 'सेहत' या दोन सामाजिक संघटनांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. तेथे गर्भधारणा पूर्व व प्रसूतीपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा सुधारित २००३ अशा कायद्याच्या याचिका दाखल करून नावातील बदलासह निकाल आला.

सन २०१२मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित अधिकारी आणि या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या तज्ज्ञ वकील आणि सामाजिक कार्यकर्त्यांची सविस्तर बैठक घेऊन प्रभावी कृती कार्यक्रम तयार केला.

### एकाच दिवशी राज्यव्यापी तपासणी

दिनांक १ नोव्हेंबर २०१३ या एकाच दिवशी चार हजारहून अधिक सोनोग्राफी केंद्रांची तपासणी झाली. केवळ सहा महिन्यांत १०११ केंद्रांवर खटले दाखल झाले. कोल्हापूर, सांगली, बीड, अहिल्यानगर हे 'हॉटस्पॉट' म्हणून चिन्हांकित झाले.

सल्लागार समितीच्या मदतीसाठी लीगल कौन्सिलर नेमण्यात आले. त्यांचे प्रशिक्षण यूएनएफपीएच्या सहकार्याने तज्ज्ञ आरोग्य अधिकारी, वकील, सामाजिक कार्यकर्ते यांच्या सहभागाने देण्यात आले. न्यायाधीशांना याबाबत अधिक संवेदनशील बनवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. त्याचा परिणाम म्हणून सुनावणी पूर्ण होऊन, १११ प्रकरणांत दोषींना शिक्षा सुनावण्यात आली. त्या वेळी महाराष्ट्र हे या कायद्याची अंमलबजावणी करणारे आणि निकाल घेणारे पहिले राज्य ठरले.

आज ती प्रतिमा पूर्णपणे डागाळली आहे.

आज २.५ किलोचे वायरलेस, बॅटरीवर चालणारे पोर्टेबल सोनोग्राफी मशीन एका बॅगेतून उसाच्या शेतात, कारमध्ये, अगदी आंतरराज्य सीमेवर - कर्नाटक-महाराष्ट्र सीमेवर नेऊन तपासणी केली जाते. एका तपासणीसाठी १५ ते ४० हजार रुपये घेतले जातात. त्याचवेळी विज्ञानाचा गैरवापर करून अनेक आयव्हीएफ सेंटर्स आणि लॅब्स फक्त मुलगेच जन्मतील, अशी तजवीज करून मुलींची संख्या कमी करण्यामध्ये सक्रिय आहेत. मुलगी नको हा पूवार्पार असणारा विचार आणि मुलगाच हवा ही मानसिकता यामुळे हा अधिक पैसा मिळवून देणारा धंदाच झाला आहे.

बाजारात Mifepristone + Misoprostol या गर्भपाताच्या गोळ्यांची बेकायदा विक्री बेसुमार वाढली आहे. ही औषधे 'शेड्युल एच १'मध्ये आहेत. म्हणजे डॉक्टरच्या चिठ्ठीशिवाय ही औषधे विकता येत नाहीत. पण सांगली, पुणे, नाशिक या जिल्ह्यांतील औषध दुकानांच्या तपासणीत असे दिसले की, अशा औषधांची ६० टक्क्यांपेक्षा अधिक विक्री विनाचिठ्ठी होते. या गोळ्यांची उलाढाल वर्षाला शेकडो कोटींची आहे. या सगळ्यात एमटीपी आणि पीसीपीएनडीटी या कायद्यांचे उल्लंघन होत आहे.

### सल्लागार समित्यांचे राजकीयीकरण

कायद्यानुसार प्रत्येक जिल्ह्यात सक्षम अधिकाऱ्यासोबत सल्लागार समिती असणे बंधनकारक आहे. त्यामध्ये कायदेतज्ज्ञ, या विषयावर काम करणारी सामाजिक संस्था, वैद्यकीय तज्ज्ञ असणे गरजेचे आहे. मात्र, गेल्या १३ वर्षांत या समित्यांमध्ये तज्ज्ञांचा समावेश करण्याऐवजी केवळ राजकीय सोय म्हणून राजकीय कार्यकर्त्यांची वर्णी लावली गेली. ज्यांनी कधी आयुष्यात एकही 'स्टिंग ऑपरेशन' पाहिले अथवा केलेले नाही, कायद्याचा अभ्यास नाही, एकाही पीडित महिलेशी बोललेले नाहीत, कायद्याच्या अंमलबजावणीचा काडीचा अनुभव नाही ते समितीत बसून काय सल्ला देणार? यामुळेच प्रत्यक्ष या क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रशासनापासून अंतर ठेवले आणि शासन-प्रशासनाचा वचक संपला.

हे सारे भ्रष्टाचाराच्या पलीकडचे आहे. पैशांचा भ्रष्टाचार शोधता येतो. १०० कोटींचा घोटाळा झाला तर ईडी, सीबीआय अशा संस्थांच्या तपासातून तो पैसा कदाचित परत आणता येईल, पण गभार्तून गायब झालेल्या एक लाख मुली परत आणता येतील का?

सोलापूर, मराठवाड्यातील काही भागांमध्ये वधू मिळत नसल्याने ३५ ते ५० वर्षे या वयोगटातील युवकांनी मोर्चे काढले. हरियाणा, पंजाबमध्ये वधू-तस्करी, मानवी तस्करीचे प्रकार वाढले. जेथे लिंग गुणोत्तर बिघडते, तिथे महिलांवरील हिंसा वाढते, हे समाजशास्त्रीय सत्य आहे.

खरे तर हा निसर्गाचा समतोल बिघडवण्याचा फौजदारी गुन्हा आहे. जिवंत स्त्रीवर अत्याचार झाला की लोक रस्त्यावर येतात, मेणबत्त्या पेटवल्या जातात, पण गर्भातील मुली गायब केल्या जात असताना आपण गप्प का? कारण हा गुन्हा रात्रीच्या अंधारात शांतपणे केला जातो आणि अन्यायाविरुद्ध टाहो फोडायला ती जिवंत राहत नाही. शिवाय तिचे आई-वडील, नातेवाईकच हा गुन्हा करण्यामध्ये सामील आहेत. पांढऱ्या ॲप्रनधारी, उच्चशिक्षित, संघटित वैद्यकीय व्यावसायिकाच्या मदतीने सुशिक्षित असलेल्या लोकांकडून हा गुन्हा होत असतो, हे आधी मान्य करावे लागेल.

अर्ध्या महाराष्ट्रात मुलींची संख्या कमी होणे, ही बाब गंभीर आहे. याची नोंद मुख्यमंत्र्यांनी घ्यावी. आरोग्यमंत्री आणि महिला बालकल्याण विभागाला सोबत घेऊन या विषयांमध्ये काम करणारे तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते यांची एक उच्चस्तरीय बैठक त्यांनी आयोजित करावी. याबाबत सूचना मागवून तातडीने कृती आराखडा आखण्यात यावा व त्यानुसार काम करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी जारी करावेत.

नवरात्र साजरे करून स्त्रीत्वाचा गौरव करायचा, तिला देवी म्हणून पूजायचे आणि दुसऱ्या बाजूला मात्र गर्भातच मुली गायब करायच्या हा आपल्या वागण्यातील विरोधाभास आपण थांबवला पाहिजे आणि कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यासाठी आग्रह धरला पाहिजे. तरच मुलींच्या जन्माचे स्वागत होईल आणि निकोप समाजाची निर्मिती होईल.

# दादांनो आता तरी झाडे लावा हो...

हल्ली मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळाचे सावट पसरले आहे. बरोबर जून महिन्यात मृग नक्षत्राला प्रारंभ झाला आणि हवामान खात्याने पावसाचा अंदाज चांगला वर्तवला की लगेच सर्व शेतकरी बांधव हवामान खात्याच्या भरवशावर थोडाफार पाऊस पडला की लागलीच पेरणी करून मोकळे होतात. परंतु हल्ली हवामान खात्याचे अंदाज फेल ठरत आहेत. हे आपल्याला माहीतच आहे. कधी कधी हवामान खात्याचा अंदाज खरा ठरतो. हे सुद्धा आपल्याला नाकारता येणार नाही. परंतु ज्या भागात वृक्षांची संख्या अधिक आहे, त्याच भागात पाऊस मुसळधार पडत आहे. आणि जिकडे झाडांची संख्या कमी आहे तिकडे मात्र पाऊसही कमी बरसत आहे. मागील दहा वर्षांपासून महाराष्ट्रात पाऊस म्हणावा तसा पडत नाही. शेतकऱ्यांच्या वाट्याला एकतर कोरडा दुष्काळ आहे नाहीतर ओला दुष्काळ आहे. पाऊस पडला की कितीही पडत आहे. आणि एकदा थांबला की पूर्ण पाऊस काळ होईपर्यंत बरसायचे नाव घेत नाही. मग काय? शेवटी शेतकऱ्यांच्या वाट्याला कोरडा दुष्काळ येणे सहाजिक आहे. पाऊस पडत नाही म्हणून शेतकरी पावसाला दोष देत आहेत. पण पाऊस कशामुळे पडत नाही, याचा विचार का बरे करत नाहीत? पाऊस न पडण्याला जबाबदार कोण आहे? तर आपण सर्वजण आहोत. कारण आपण वृक्ष लागवड करण्याऐवजी वृक्षतोड करून निसगार्ला भकास करून टाकले आहे. मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करायची आणि त्या जागी मोठ मोठ्या बिल्डिंग, उद्योग धंदे आणि कारखाने उभे करायचे. त्यात आपलीही काही चुकी नाही. कारण लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे, लोकसंख्या वाढत असल्यामुळे लोकांना राहण्यासाठी जागा कमी पडत आहे. जागा व्हावी म्हणून वृक्षतोड आपण करत आहोत. पण याचा परिणाम थेट ऋतुचक्रावर होत आहे. म्हणून लोकसंख्या विकासात वाढ थांबवणे ही देखील काळाची गरज आहे. हम दो, हमारे दो ही पद्धत अस्तित्वात आणावी लागेल.तरच लोकसंख्या कमी होईल आणि वृक्षतोड कमी होईल. नाहीतर लोकसंख्या वाढत गेली आणि लोकांना राहण्यासाठी जागा कमी पडू लागली की लोक आपोआप वृक्षतोड करून त्या ठिकाणी घरे बांधतात आणि आपण सगळ्यांनी मिळून मोकळ्या जागेत, रस्त्याच्या कडेने, घराच्या समोर, शेतातील बांधावर वृक्ष लागवड करून पर्यावरणाला आणि निसगार्ला अबाधित ठेवणे काळाची गरज आहे. आपण जेवढे झाडे लावाल तेवढा अधिक पाऊस पडण्याची शक्यता असते. आपण पाहतोय की हल्ली ज्या भागात वृक्षांची संख्या कमी आहे त्या भागात पाऊस पडत नाही आणि ज्या भागात वृक्ष मोठ्या प्रमाणात आहेत तिथे मात्र पाऊस थांबायचे नाव घेत नाही. हल्ली मराठवाड्यावर कोरडा दुष्काळ पडण्याचे कारण म्हणजे वृक्षतोड आणि जल प्रदूषण कारणीभूत आहे.

यावषीर्चा दुष्काळ 1972 च्या दुष्काळापेक्षा भयानक दुष्काळ म्हणून जाहीर केला आहे. मृग नक्षत्राला आरंभ होताच थोडाफार पाऊस पडला की शेतकरी शेतात पेरणी करतात. शेती देखील यावर्षी चांगली पिकणार होती परंतु निसर्गाच्या दुष्टचक्रात शेती अडकली. लोकांना देखील वाटू लागले की, आता यावर्षी चांगली सुगी होणार. परंतु शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आणि अचानक पावसाने बरसने थांबवले. आणि शेतकरी नैराश्याच्या कचाट्यात अडकले. पूर्ण पावसाळा संपून आता हिवाळ्याला आगमन होत आहे. तरी अजून देखील पाऊस पडायचा पत्ता नाही. विशेष करून शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील शेतकरी दुष्काळाच्या झळा सोसत आहेत. शेतातील विहिरीला पाणी नाही. विहिरी, तलाव, नद्या आणि खदानी देखील कोरड्या पडायच्या मार्गावर आहेत. हातपंपाला आणि बोरला देखील पाणी आता कमी प्रमाणात येत आहे. दुष्काळामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. तळे विहिरी आणि नद्या कोरड्याठाक पडल्यामुळे पशु प्राण्यांचे जीवन धोक्यात आले आहे. लोकांना पाण्याच्या शोधात वनवन भटकावे लागणार आहे. जनावरांना चाऱ्याची नितांत गरज भासणार आहे. पाण्याअभावी व चाऱ्या अभावी माणसांचे आणि इतर प्राण्यांचे हाल हाल होणार आहेत. आता लोकांचा कल पुणे व मुंबई या ठिकाणी कामासाठी लोकांची गर्दी पडणार आहे. यावर्षी पाऊस पडला नाही आता पुढल्या वर्षी देखील पडेल का नाही? याचा भरवसा काय? कारण सांगायचा मूळ मुद्दा म्हणजे याला कारणीभूत आपणच आहोत परंतु आपण निसगार्ला दोष देत आहोत. यावर्षी शेतकऱ्यांची दिवाळी देखील गोड होणार नाही. कोणतेच सण-उत्सव थाटात साजरे केले जाणार नाहीत. दुष्काळाच्या झळा आणि नापिकीला कंटाळून शेतकरी आत्महत्या करत आहेत. शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. सावकाराचे कर्ज, घर संसार, मुला मुलींचे शिक्षण आणि इतर लागणारा खर्चा यामुळे शेतकरी कोलमडून गेला आहे. आतून पूर्णपणे खचून गेला आहे. भविष्याचा विचार करून शेतकरी निराश होत आहे आणि आत्महत्या करत आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी निसगार्ला व हवामान खात्याला दोष देत बसण्यापेक्षा आपल्या सतःला दोषी ठरवून मोठ्या प्रमाणात होणारी वृक्षतोड थांबवावी आणि मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी. त्यासाठी शेतकऱ्यांनी आता तरी जागृत होण्याची गरज आहे. वृक्षतोड करणाऱ्यांवर शासनाने कठोर कारवाई करावी. प्रत्येकाने दोन ते तीन झाडे दत्तक घेऊन त्या झाडांचे मोठ्या वृक्षात रूपांतर होईपर्यंत चांगले संगोपन करावे आणि भकास, उजाड व विद्रूप झालेला निसर्ग पुन्हा एकदा हिरव्या शालूने नेसवावा. नाहीतर आपण निसगासीबत पंगा घेत असाल तर तो आपल्याला जिव्हारी लागणार आहे. निसगासीबत नाद करणे बरा नाही. आपण असेच वृक्षतोड करीत राहिलो आणि वृक्ष लावण्याचा उपक्रम हाती जर घेतला नसेल तर समजा एक दिवस आपल्याला उष्णतेच्या झळांनी भाजून निघावे लागेल. प्रशासनाने देखील याची गांभीयार्ने दखल घेणे हल्ली गरजेचे आहे. शेतकरी जगाचा पोशिंदा आहे तो जगला तरच शेती पिकेल आणि देश जगेल. नाहीतर जगाला एक दिवस तडफडून मरावे लागणार आहे, एवढे मात्र निश्चित. म्हणून दादांनो जागृत होऊन आता तरी झाडे लावा हो...

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता.अहमदपूर
जिल्हा लातूर
मो.7498715661

## पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणूक :

# जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी घेतला तयारीचा आढावा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त)ः-** पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील निवडणूक तयारीचा जिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज सर्व नोडल अधिकाऱ्यांकडून सविस्तर आढावा घेतला. निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाच्या सर्व सूचनांचे काटेकोर पालन करावे. कोणत्याही स्तरावर हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे निर्देश त्यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पदवीधर शिक्षक मतदार संघाच्या सर्व नोडल अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी घेतला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी तथा आदर्श आचारसंहिता कक्ष प्रमुख अभिजीत पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी किरण सुरवसे, उपजिल्हाधिकारी महसूल लक्ष्मण कासेकर, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांच्यासह सर्व संबंधित नोडल अधिकारी उपस्थित होते.

### मतदान, प्रशिक्षण आणि आचारसंहितेच्या अंमलबजावणीवर भर

पदवीधर व शिक्षक मतदारसंघासाठी २३ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदान साहित्याचे वितरण जिल्हास्तरावरून रामवाडी गोडाऊन येथून २१ ऑक्टोबर रोजी तालुकास्तरीय यंत्रणाकडे करावे तसेच २२ ऑक्टोबर रोजी सकाळी तालुकास्तरीय यंत्रणांनी मतदान केंद्रावर साहित्य घेऊन जाण्यासाठी मतदान केंद्र अधिकारी- कर्मचारी यांच्याकडे साहित्य वितरण करावे. त्याप्रमाणेच मतदानाची प्रक्रिया पार पाडल्यानंतर मतदान केंद्रावरील साहित्य तेथून जिल्हा स्तरावर रामवाडी गोडाऊन येथे घेऊन यावे व यानंतर एकत्रित सर्व मत पेट्या येथून पुणे येथील बालेवाडी येथे घेऊन जाण्यासाठी सर्व संबंधित अधिकारी तसेच पोलीस बंदोबस्त चोखपणे ठेवावा, असे निर्देश त्यांनी दिले.

सर्व निवडणूक अधिकारी- कर्मचाऱ्यांनी निवडणूक प्रशिक्षण योग्य पद्धतीने घ्यावे व त्याची मतदान व मतमोजणी दिवशी अमलबजावणी करावी. निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यावर समन्वय राखून वेळेत कामे पूर्ण करावीत आणि निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले. सर्व नोडल अधिकारी व पथकांनी समन्वयाने काम करून निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडावी, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रारंभी उपजिल्हाधिकारी कासेकर यांनी जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघांतील एकूण १९३ मतदान केंद्रांच्या व्यवस्थापनाचा आढावा घेण्यात आला. यामध्ये पदवीधर मतदारसंघासाठी ११७, तर शिक्षक मतदारसंघासाठी ७६ मतदान केंद्रांचा समावेश आहे. मतदानासाठी आवश्यक मनुष्यबळ नियोजन, वाहतूक व्यवस्था, मतदान साहित्य, स्ट्राँग रूम व्यवस्थापन तसेच विविध निवडणूकविषयक कामांच्या प्रगतीची माहिती दिली.

तर उपजिल्हा निवडणूक अधिकारी किरण सुरवसे यांनी खाजगी आस्थापनातील कामगारांसाठी मतदानाच्या दिवशी चार तास विशेष सवलत द्यावी असे भारत निवडणूक आयोगाने निर्देशित केले असल्याचे सांगितले. तर आदर्श आचारसंहिता कक्ष प्रमुख अभिजीत पाटील यांनी आचारसंहिता भंगाचे दोन गुन्हे दाखल झाले असून आज रोजी पर्यंत १७९ शस्त्र जमा झाल्याचे सांगितले. त्याप्रमाणेच साहित्य व्यवस्थापन चे नोडल अधिकारी श्री. पडोळे यांनी निवडणूक आयोगाकडून सर्व साहित्य उपलब्ध झाले असून ते रामवाडी गोडाऊन येथून २१ ऑक्टोबर रोजी तालुका नेहाय वाटप करण्यात येणार असल्याचे सांगितले.

### २२ प्रकारच्या नोडल अधिकाऱ्यांकडून तयारीचा अहवाल

बैठकीत आदर्श आचारसंहिता व कायदा-सुव्यवस्था विभागाचे नोडल अधिकारी अभिजित पाटील (निवासी उपजिल्हाधिकारी), मनुष्यबळ व वेबकास्टिंगचे आशिष लोकरे, प्रशिक्षण व्यवस्थापनाचे संतोषकुमार देशमुख व सुशांत बानसोडे, साहित्य व्यवस्थापनाचे ओंकार पाडोळे, मतदार जागृती कार्यक्रमाचे (रश्एएढ) नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी संबंधित कामकाजाची माहिती दिली.

याशिवाय मतपत्रिका व पोस्टल बॅलेट, मीडिया, कम्युनिकेशन, वैद्यकीय सुविधा, जम्बो बॅलेट बॉक्स आणि इतर निवडणूकविषयक व्यवस्थापनाची जबाबदारी असलेल्या सर्व २२ प्रकारच्या नोडल अधिकाऱ्यांनी आपापल्या तयारीचा अहवाल सादर केला.

# मंत्री, आमदारांसह १०० हून अधिक सहकार सम्राटांना घरचा रस्ता

**मुंबई (कटूसत्य वृत्त)ः-** सहकारी बँकावर सलग १० वर्षे संचालक म्हणून सत्ता गाजविलेल्यांना आता या बँकावर काम करण्यास तसेच निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविणाऱ्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयानेही शिक्कामोर्तब केल्याने राज्यातील आजी माजी मंत्री, आमदारांसह किमान १०० हून अधिक सहकार सम्राटांचे धाबे दणाणले आहेत.



येत्या काळात होणाऱ्या जिल्हा बँकाच्या निवडणुकीपासून या सर्वांना दूर रहावे लागणार आहे.

जिल्हा मध्यवर्ती आणि नागरी सहकारी बँकामध्ये सत्ता एकाच ठिकाणी केंद्रित होऊ नये, मक्तेदारी टळावी आणि इतर पात्र उमेदवारांना समान संधी मिळावी यासाठी केंद्र सरकारने बँकिंग नियमन कायद्यात सुधारणा करुन सहकारी बँकेमध्ये सलग १० वर्षे किंवा त्याहून अधिक काळ संचालक राहिलेल्या व्यक्तींना अपात्र ठरवितांना आगामी निवडणूक लढविण्यासही प्रतिबंध करण्याची तरतूद केली आहे. सन २०२१ पासून या कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली आहे. मात्र गेल्या पाच वर्षात या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या कोणावरही अपात्रतेची कारवाई झालेली नव्हती. मात्र लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी आणि भाजप यांच्यातील सत्तासंघर्ष उफाळून आल्यानंतर भाजपाकडून सहकारमंत्री आणि बँकेचे संचालक बाबासाहेब पाटील यांच्या विरोधात आधी न्यायालयात आणि नंतर भारतीय रिजर्व्ह बँकेकडे (आरबीआय) तक्रार करण्यात आली. यातून पाटील यांचे लातूर जिल्हा बँकेतील संचालकपद संपुष्टात आले. मात्र पुन्हा निवडणूक लढविण्याच्या त्यांच्या प्रयत्नावरही सर्वोच्च न्यायालयाच्या शुक्रवारच्या निकालाने पाणी फेरले.

राज्यात सध्या अहिल्यानगर, यवतमाळ, लातूर, सातारा, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकाच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून येत्या दोन महिन्यात मुंबई, पुणेसह सोलापूर, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, जळगाव, धुळे- नंदूरबार, रत्नागिरी, अमरावती या जिल्हा मध्यवर्ती बँकाची निवडणूक होणार आहे. राज्यातील मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेचा अपवाद वगळता बहुतांश जिल्हा बँकावर काँग्रेस- राष्ट्रवादी या पक्षांची वषार्नुवर्षे सत्ता राहिलेली आहे. बँकिंग नियमन कायद्यातील सुधारणा या बँकामधील सहकार सम्राटांसाठी अडचणीची ठरणारी असली तरी भाजपासाठी फायदेशीर ठरु लागली आहे. या कायद्याचा आधार घेत भाजपाने जिल्ह्याच्या राजकारणात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या जिल्हा बँकावर सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न चालविला आहे. त्यामुळे राष्ट्रवादीने सहकार विभागाचा उपयोग करीत २१ ऑगस्टच्या आदेशान्वये सहकारी बँकाच्या संचालकांचा १० वषार्चा कार्यकाळ पूर्ण झाला म्हणून त्यांना निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविण्याबाबत सहकार कायद्यात कोणतीही तरतूद नाही. बँकिंग नियमन कायद्यातील अपात्रतेच्या तरतूदी सरकारने अद्याप स्वीकारलेल्या नसतानाही त्यांची परस्पर अंमलबजावणी करणे नियमबाह्य असून, १० वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झालेल्या कोणत्याही संचालकांना निवडणूक लढविण्यापासून अपात्र ठरवू नका, असे स्पष्ट आदेश सहकार निवडणूक प्राधिकरणास दिले होते. मात्र राष्ट्रवादीच्या या प्रयत्नांवरही न्यायालयाने पाणी फेरले असून या सरकारच्या या आदेशाला कायदेशीर आधार नसल्याचे स्पष्ट करीत केराची टोपली दाखविली आहे.

### या नेत्यांना फटका

जिल्हा बँकावर वर्षानुवर्षे ठाण मांडून बसलेल्या पुढाऱ्यांना मोठा धक्का बसला आहे. सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, कोल्हापूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष आणि वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे, आमदार दिलीप वळसे पाटील, भाजप आमदार प्रविण दरेकर व प्रसाद लाड, सुनिल राऊत, राजेश विटेकर, विनय कोरे, एकनाथ खडसे, सुरेश देशमुख, रमेश थोरात, प्रताप पाटील चिखलीकर, गुलाबराव देवकर, सुरेश देशमुख, राजेश विटेकर, रामप्रसाद बोर्डीकर, सुरेश वरपूडकर, अनिल पाटील या मंत्री, आजी-माजी आमदारांसह सुमारे १०० हून अधिक सहकार संम्राटांना यावेळी जिल्हा बँकेची निवडणूक लढविता येणार नाही. त्यामुळे या मंडळींनी आता आपल्या सग्यासोयऱ्यांची बँकेवर वर्णी लावण्याचे डावपेच सुरू केले आहेत.

# प्रचारार्थ खा धैर्यशील मोहिते-पाटील यांची फॅबटेक टेक्निकल कॅम्पसला भेट



**सांगोला (कटूसत्य वृत्त)ः-** पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार सौ. हर्षदा देशमुख-जाधव आणि शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार जयंत आसगावकर यांच्या प्रचारार्थ खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सांगोला तालुक्यातील फॅबटेक टेक्निकल कॅम्पसला भेट दिली. यावेळी त्यांनी प्रा. भाऊसाहेब रुपनवर यांची भेट घेऊन महाविद्यालयातील शिक्षक आणि पदवीधर मतदारांशी संवाद साधला.

### शिक्षक व पदवीधरांच्या प्रश्नांवर सक्षमपणे काम करण्याचे आश्वासन

या संवादादरम्यान शिक्षण क्षेत्रासमोरील विविध प्रश्न, शिक्षकांच्या अडचणी तसेच पदवीधरांच्या अपेक्षांवर चर्चा करण्यात आली. शिक्षण क्षेत्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी तसेच शिक्षक आणि पदवीधरांच्या प्रश्नांना सक्षमपणे न्याय देण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार कटिबद्ध असल्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सांगितले.

### पहिल्या पसंतीचे मत देऊन विजयी करण्याचे आवाहन

महाविकास आघाडीच्या उमेदवार सौ. हर्षदा देशमुख-जाधव आणि जयंत आसगावकर यांना पहिल्या पसंतीचे मत देऊन विजयी करावे, असे आवाहन खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी शिक्षक व पदवीधर मतदारांना केले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक, पदवीधर मतदार आणि पदाधिकारी उपस्थित होते.

## वात्रटिका

### लंघन सीमेचे

मुहूर्त साधून अनेकांनी
परवा सीमोल्लंघन केले...
अनोख्या होत्या शुभेच्छा
आणि शब्दांचे सोने लुटले...

कोणाचे सोने बावनकशी
कोणाचे कॅरेट होते कमी...
तेच होते गाणे आणि तीच
ती होती एकमेकांची डमी...

**हणमंत पडवळ**
धाराशिव
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडुरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडुरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# कार्तिकी यात्रा कालावधीत पाण्याचे सूक्ष्म आणि काटेकोर नियोजन करावे -प्रांताधिकारी सचिन इथापे

**पंढरपूर,(कटूसत्य वृत्त):-** कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी सुमारे 8 ते 10 लाख भाविक येतात. वारीच्या पार्श्वभूमीवर यंदा दुष्काळजन्य परिस्थिती लक्षात घेता, पंढरपुरात येणाऱ्या भाविकांची (वारकऱ्यांची) पाण्यासाठी गैरसोय होऊ नये तसेच वारी कालावधीत पाण्याचा तुटवडा भासू नये आणि आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पाण्याचे सूक्ष्म आणि काटेकोर नियोजन करावे अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.



कार्तिकी यात्रा नियोजनाबाबत प्रांताधिकारी कार्यालय, सांस्कृतीक भवन पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी प्रसन्न भातलवंडे, तसेच संबधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले, कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात. कार्तिकी शुध्द एकादशी शनिवार दि. 21 नोव्हेंबर, 2026 रोजी असून, यात्रा कालावधी दि. 10 ते 28 नोव्हें. असा राहणार आहे. या यात्रा कालावधीत वारकरी, भाविकांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी योग्य नियोजन करावे, यात्रा कालावधीत नगरपालिकेने स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा मुबलक पाणी पुरवठा करावा, चंद्रभागा वाळवंटात स्वच्छता व पुरेशा प्रकाश राहिल याबाबत नियोजन करावे, शहरातील अतिक्रमणे कायमस्वरुपी काढण्याबाबत नगरपालिका व पोलीस प्रशासनाने संयुक्त पथकाची नेमणूक करावी. पाटबंधारे विभागाने नदीपात्रात पाणी सोडण्याबाबतचे योग्य नियोजन करावे. आरोग्य विभागाने मुबलक औषधसाठा उपलब्ध ठेवावा. भक्ती सागर (65 एकर) येथील जागेची स्वच्छता करुन वीज, पाणी आदी व्यवस्थेची उपलब्धता करावी

यात्रा कालावधीत वाखरी येथे जनावरांचा बाबजार मोठ्या प्रमाणात भरत असल्याने तेथे जनावरांच्या व पशुपालकांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व पशुवैद्यकीय पथकाची नेमणूक करावी. मंदीर समितीने दर्शन रांगेत घुसघोरी होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच स्कायवॉकचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे. अन्न औषध प्रशासन विभागाने खाद्य पदार्थ तसेच प्रसादाच्या दुकानाची वेळोवेळी तपासणी करावी. अशा सूचनाही प्रांताधिकारी श्री इथापे यांनी यावेळी दिल्या.

श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदीर समितीने भाविकांच्या सुलभ व जलद दर्शनाला प्राधान्य दिले असून, दर्शन रांगेत घुसघोरी होऊ नये यासाठी जादा सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात येणार आहे. दर्शन रांगेतील भाविकांसाठी स्वच्छता, पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय आदी आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात येणार असल्याचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी सांगितले. तसेच नगर पालिका प्रशासनाकडून यात्रा शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, आवश्य ठिकाणी बॅरेकेटींग, पार्कींग व्यवस्था, वेळोवेळी स्वच्छता याबाबतचे नियोजन केले असल्याचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सांगितले.

# एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात 'इल्युमिनेट' उपक्रम उत्साहात संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव-सोलापूर येथील उद्योजकता विकास कक्षाच्या (ई-सेल) वतीने आयआयटी बॉम्बेच्या ई-सेलच्या सहकार्याने 'इल्युमिनेट' या विशेष उद्योजकता मार्गदर्शन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विविध अभियांत्रिकी शाखांतील ७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची जाणीव निर्माण करणे आणि नाविन्यपूर्ण संकल्पनांना व्यवसायाचे स्वरूप देण्यासाठी प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमात आयआयटी बॉम्बेच्या ई-सेलचे प्रतिनिधी यासीन शेख यांनी विद्यार्थ्यांना उद्योजकीय मानसिकता, नाविन्यपूर्ण कल्पनांचे स्टार्टअपमध्ये रूपांतर, व्यवसाय नियोजन, आर्थिक व्यवस्थापन आणि निधी उभारणीच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. तसेच आयआयटी बॉम्बेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या 'युरेका!' आणि नॅशनल एंटरप्रेन्योरशिप चॅलेंज (NEC) या उपक्रमांची माहिती देऊन विद्यार्थ्यांना उद्योजकीय संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

या उपक्रमांतर्गत आयोजित कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण व्यावसायिक संकल्पना मांडल्या. प्रश्नोत्तरांच्या सत्रात स्टार्टअपची उभारणी, व्यवसायातील आव्हाने आणि उद्योजकतेच्या क्षेत्रातील उपलब्ध संधी यासंदर्भातील विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या व्यावहारिक पैलूंची माहिती मिळाली.

विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या संधी शोधण्यापुरते मर्यादित न राहता रोजगारनिर्मिती करणारे उद्योजक बनावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी केले. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय कौशल्ये विकसित करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व असल्याचे त्यांनी नमूद केले.

या उपक्रमाला संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. ई-सेलचे प्राध्यापक समन्वयक प्रा. एम. आर. सपाळी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी टीमने कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन यशस्वीरीत्या केले.

आयआयटी बॉम्बेसारख्या नामांकित संस्थेच्या उद्योजकता परिसंस्थेशी सोलापूरच्या विद्यार्थ्यांना जोडणारा 'इल्युमिनेट' हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण विचार, आत्मविश्वास आणि उद्योजकीय दृष्टिकोन विकसित करण्यासाठी प्रेरणादायी ठरला.

# कायदेशीर दत्तक प्रक्रियेतून बालकाला मिळाले हक्काचे घर



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** अनाथ, निराधार तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना सुरक्षित, प्रेमळ आणि हक्काचे कुटुंब मिळावे, यासाठी दत्तक विधानाची प्रक्रिया कायदेशीर मार्गाने पूर्ण करणे आवश्यक आहे. याच अनुषंगाने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात कायदेशीर दत्तक विधानाची प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेद्वारे एका बालकाला हक्काचे घर मिळाले. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या हस्ते बालक हस्तांतरण व प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या वतीने दत्तक विधान प्रक्रियेबाबत जनजागृती करण्यात येत आहे. दत्तक प्रक्रियेमध्ये बालकाचे सर्वोत्तम हित, सुरक्षितता आणि उज्ज्वल भविष्य यांना प्राधान्य दिले जाते. बालकाला कुटुंबाचा आधार, प्रेम आणि सुरक्षित वातावरण मिळावे, हा या प्रक्रियेचा मुख्य उद्देश आहे.

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी इच्छुक दत्तक पालकांनी शासनाच्या अधिकृत केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरणाच्या (सीएआरए) माध्यमातून नोंदणी करून विहित कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन केले. दत्तक घेऊ इच्छिणाऱ्या पात्र दाम्पत्यांनी तसेच नियमानुसार पात्र अविवाहित व्यक्तींनी अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करणे, आवश्यक कागदपत्रे सादर करणे, गृहअभ्यास अहवालाची प्रक्रिया पूर्ण करणे, बालकाचे नियमानुसार संदर्भीकरण करून कायदेशीर दत्तक आदेशाची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

बालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अनधिकृत मार्गाने दत्तक प्रक्रिया करणे टाळावे. शासनाच्या अधिकृत यंत्रणेमार्फतच दत्तक प्रक्रिया पूर्ण करून बालकांना कायदेशीर संरक्षण आणि कुटुंबाचा आधार मिळवून द्यावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

या वेळी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी अविनाश मगर, जिल्हा परिविक्षा अधिकारी वैशाली भोसले, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी नितीन थोरात, चाइल्डलाइन समन्वयक आनंद ढेपे, समुपदेशक मल्लिनाथ तमशेट्टी, पर्यवेक्षक विश्वेश्वर वाघमारे, अनोज कदम, नवरंगे बालकाश्रमच्या अधीक्षक राजश्री गाडे तसेच दत्तक पालक उपस्थित होते.

# डॉ. सोहेल शेख लिखित 'द प्रोफेटिक मेथड ऑफ टीचिंग' पुस्तकाचे प्रकाशन



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या करण्यात येणाऱ्या वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून एम. ए. जोहर उर्दू हायस्कूल, मोहोळ येथील लेखक व संशोधक डॉ. सोहेल शेख लिखित 'द प्रोफेटिक मेथड ऑफ टीचिंग' या २४ व्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

१५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत या पुस्तकाचे प्रकाशन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. डॉ. सोहेल शेख हे शैक्षणिक, साहित्यिक आणि संशोधन क्षेत्रात कार्यरत असून, त्यांच्या 'द प्रोफेटिक मेथड ऑफ टीचिंग' या पुस्तकामध्ये पैगंबर हजरत मुहम्मद यांच्या आदर्श शिक्षणपद्धतीचा, अध्यापनाच्या विविध तत्त्वांचा तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी दिलेल्या मार्गदर्शनाचा अभ्यास करण्यात आला आहे.

पैगंबर मुहम्मद यांनी ज्ञान, नैतिकता, शिस्त, प्रेम, सहिष्णुता आणि उत्तम चारित्र्य यांना शिक्षणामध्ये दिलेले महत्त्व या पुस्तकातून अधोरेखित करण्यात आले आहे. त्यांच्या आदर्श शिक्षणपद्धतीचा आधुनिक शिक्षणव्यवस्थेच्या संदर्भात अभ्यास करण्याचा हा एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक व संशोधनात्मक प्रयत्न आहे.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी विद्यार्थ्यांना वाचन, ज्ञानार्जन, संशोधन आणि नवविचारांची प्रेरणा दिली. त्यांच्या जयंतीनिमित्त या शैक्षणिक पुस्तकाचे प्रकाशन होणे ही वाचनसंस्कृती आणि ज्ञानप्रसाराला प्रोत्साहन देणारी बाब ठरली आहे.

या पुस्तकाच्या प्रकाशनाबद्दल लेखक व संशोधक डॉ. सोहेल शेख यांचे शैक्षणिक, साहित्यिक व संशोधन क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात आले.

# कर्जमाफीपासून वंचित शेतकऱ्यांना न्याय द्या

## नामदेव पवार यांची महसूलमंत्री बावनकुळे यांच्याकडे मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळावा, शेतीसाठी दररोज आठ तास वीज उपलब्ध करून द्यावी, तसेच जनावरांसाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था करावी, अशा विविध मागण्यांसाठी रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष नामदेव पवार यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले.



राज्यातील अनेक शेतकरी विविध कारणांमुळे कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिले आहेत. अशा सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळावा आणि त्यांना आर्थिक संकटातून दिलासा मिळावा, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच शेतीसाठी दररोज आठ तास वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यात यावा, जेणेकरून शेतकऱ्यांना पिकांना वेळेवर पाणी देता येईल, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

दुष्काळी परिस्थिती आणि पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी चारा व पाण्याची योग्य व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. याशिवाय शेतकऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावून त्यांना दिलासा द्यावा, अशी मागणीही नामदेव पवार यांनी महसूलमंत्र्यांकडे केली.

शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन शासनाने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी भूमिका रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष नामदेव पवार यांनी या भेटीदरम्यान मांडली. आता शासन या मागण्यांबाबत कोणती भूमिका घेते, याकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

# दत्तात्रय सावंत म्हणजे शिक्षक चळवळीत वाहून घेतलेले नेतृत्व

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दत्तात्रय सावंत हे केवळ राजकारणी नसून शिक्षक आणि शेतकऱ्यांच्या मुलांच्या हक्कासाठी लागणारे आणि शिक्षक चळवळीत स्वतःला वाहून घेतलेले प्रामाणिक नेतृत्व आहे असे मत राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर यांनी व्यक्त केले. अक्कलकोट येथे दत्तात्रय सावंत यांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या शिक्षकांच्या मेळाव्यात ते बोलत होते.



पुणे विभाग शिक्षक विधानपरिषद मतदार संघाच्या निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आला असून राजकीय घडामोडींना प्रचंड वेग आला आहे. राष्ट्रीय समाज पक्षाचे (रासप) संस्थापक-अध्यक्ष महादेव जानकर यांनी स्वतः या निवडणुकीत उडी घेतली असून, पक्षाचे अधिकृत उमेदवार माजी आमदार प्रा. दत्तात्रय सावंत यांच्या प्रचारार्थ झंझावाती दौरा सुरू केला आहे.

**मतदारांना भावनिक साद आणि विरोधकांवर निशाणा**

प्रचारादरम्यान विविध शाळा, महाविद्यालये आणि शिक्षक मतदारांच्या भेटी घेताना महादेव जानकर यांनी प्रा. दत्तात्रय सावंत यांचे वर्णन "२४ कॅरेट सोनं" असे केले. ही लढाई पैशांच्या बळावर निवडणूक लढवणाऱ्यांविरुद्ध एका सामान्य आणि प्रामाणिक माणसाची आहे, असा टोला त्यांनी विरोधकांना लगावला. शिक्षक मतदारांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता मतपत्रिकेवरील ५ क्रमांकासमोरील प्राधान्यक्रमाचे मत देऊन दत्तात्रय सावंत यांना विजयी करावे, असे भावनिक आवाहन जानकर यांनी केले आहे.

# शिक्षकेतरांचे प्रश्न लवकरच मार्गी लागतील - चंद्रकांत पाटील



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न लवकरच मार्गी लागतील, असे आश्वासन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.

मंत्री पाटील हे सोलापूर दौऱ्यावर आले असता सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियन तर्फे जिल्हाध्यक्ष दत्ता भोसले यांच्या नेतृत्वाखाली त्यांना भेटून निवेदन देण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते कॉलेज कर्मचारी युनियनने 10 20 30 चा प्रश्न आश्वासन प्रगती योजना यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील रकटलेली नोकर भरती व अनुकंपाच्या जागा तातडीने भरण्यास यावी अशी मागणी त्यांच्याकडे केली.

जर मागण्या मान्य न झाल्यास पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीवर कुटुंबियासह बहिष्कार घालून मतदानापासून अलिप्त राहण्याचा इशारा दिला होता. परंतु उच्च शिक्षण मंत्री पाटील यांनी कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिल्यानंतर मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय मागे घेत असल्याचे अध्यक्ष दत्ता भोसले यांनी जाहीर केले.

यावेळी संघटनेचे सरचिटणीस राजेंद्र गिड्डे, उपाध्यक्ष आनंद हो टकर,खजिनदार राहुल खराडे, विद्यापीठ सिनेट सदस्य अजित संगवे, भानुदास घंदुरे, शहाजी जाधव, केशव लोंढे, महेश ढेंगळे,संतोष अलकुंटे, संजीव थिटे,दत्तात्रय सुतार, विलास झरेकर, रोहन हावळे, यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

**आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**
**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**
**संपर्क - 9422602337, 8317212037**

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल
**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. **9420766666**

(सरकार मान्य)
### अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे. संपर्क 9145451809 भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू

**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने** मो. 9353370779
**रेखा बर्वे** मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | ३ | | ४ | ५ | ■ | ६ | | ७ |
| | ■ | ■ | ८ | | ■ | ९ | | | | ■ | |
| १० | ११ | | | ■ | १२ | ■ | | ■ | | ■ | |
| १३ | | ■ | १४ | १५ | | १६ | ■ | १७ | | १८ | |
| १९ | | २० | ■ | २१ | | | | | ■ | | ■ |
| | ■ | २२ | २३ | | ■ | ■ | ■ | २४ | | | ■ |
| २५ | २६ | ■ | | ■ | २७ | | २८ | | ■ | ■ | २९ |
| ■ | ३० | ३१ | | ■ | | ■ | | ■ | ३२ | ३३ | |
| ३४ | | | ■ | ३५ | | ■ | ३६ | ३७ | | | ■ |
| ३८ | | ■ | ३९ | | | ■ | ४० | | ■ | ४१ | ४२ |
| ४३ | | ४४ | ■ | | ■ | ४५ | ■ | ४६ | ४७ | ■ | |
| ४८ | | | ■ | ४९ | | | | ■ | ५० | | |

**उभे शब्द :** १) रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार २) निसर्ग (हिंदीत) ३) महिना ४) तुतारी ५) श्रीकृष्णाची आई ६) शिवसेनेचे एक माजी मंत्री-**** रावते ७) सैन्यदलाचा प्रमुख, सेनापती ११) डाळीपासून बनविलेले तिखट नसलेले कालवण १२) दाक्षिणात्य चित्रपट अभिनेता-*** हसन १५) वाद्यांचा होणारा आवाज, निनाद १६) दशा, अवस्था, मागच्या वेळी १७) मजबूत, कणखर १८) ढग (हिंदीत) २०) बशीचा साथीदार २३) गाणे गाणारा, गवई २६) अमिताभचा एक चित्रपट-मि. ****** २७) लाकूड कापण्याचे साधन २८) लोकजनशक्ती पार्टीचे संस्थापक नेते-स्व. रामविलास **** २९) एक आणि अर्धा ३१) पाणी निघून जाण्यासाठी खोदलेला खंदक ३२) कावळा ३३) स्पर्शाने लोखंडाचे सोने करणारा कथित घटक ३४) एक हिंदी न्यूज चॅनल ३५) किलोमधील चौथा भाग ३७) सैन्याला पुरवला जाणारा दाणागोटा ४२) एक प्रसिध्द आंबा ४४) रख उलट लिहा ४५) या राज्याची राजधानी पणजी आहे ४७) पाण्याचे बाष्परूप

**आडवे शब्द :** १) आ. प्रणिती शिंदे यांचे वडील
६) रात्रच्या विरूध्दार्थी शब्द ८) दहा (हिंदीत) ९) बोभाटा, बोलबाला
१०) त्वरेने, पटकन १३) जरचा साथीदार १४) गर्मीमुळे होणारी उलघाल, बेचैनी
१७) राजाची सभा १९) मऊ नसलेले, कडक
२१) पोहणे
२२) नोकरदाराला मिळणारे वेतन २४) कमळ (हिंदीत)
२५) पाऊस (इंग्रजीत) २७) लाकडी फळ्या ठोकून केलेले घराचे छत
३०) सततचा मागणीचा केलेला पाठपुरावा, तगादा
३२) वस्त्र ३४) एक म्हण-भीक नको पण कुत्रा ***
३५) मनी नाही भाव अन् देवा मला **
३६) पंढरपूरला पायी जाणारे भाविक ३८) रज उलट लिहा
३९) नवऱ्याची दुसरी बायको ४०) रक्तवाहिनी, शीर ४१) तीन दुणे
४३) मुस्लिम धर्मामध्ये पती-पत्नीचे एकमेकांपासून विभक्त होणे
४६) औषध (हिंदीत) ४८) रंग (इंग्रजीत)
४९) शासकीय कर्मचाऱ्यांचा सुट्टीचा दिवस
५०) वरून काटेरी पण आतून गोड असणारे कोकणात मिळणारे एक फळ

## सुडोकु - 82

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 6 | | 3 | | | 4 | 1 | |
| 1 | 8 | 5 | | 2 | | 7 | | 3 |
| | | | 5 | | | 9 | 2 | 8 |
| | 9 | 6 | 8 | | 2 | | 5 | 7 |
| 2 | 1 | | | 4 | | 3 | | |
| | 5 | | | | 6 | | 8 | 4 |
| 5 | | | | | 4 | 6 | | |
| | | | 6 | 1 | 3 | 5 | 4 | |
| | | 9 | | | 7 | | | |

# व्हि. आर. पवार यांच्या धाराशिव येथील शोरुम चे थाटात शुभारंभ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** धाराशिव मर्दिनी श्री तुळजाभवानी च्या पावन नगरीत उत्तम दर्जा आणि योग्य किंमत असलेल्या महाराष्ट्रातील सर्वात मोठे फॅमिली शोरूम असलेल्या व्हि. आर. पवार यांच्या परिवारातील धाराशिव येथील तिसऱ्या शोरूमचे शुभारंभ पारंपारिक पद्धतीने पूजा करून करण्यात आले असल्याचे मुख्य व्यवस्थापन राजेश पवार यांनी सांगितले.

एमआयडीसी रोड, तेरणा कॉलेज समोर असलेल्या मॉल चौक मधील भव्य अशा स्वरूपात निर्माण केलेल्या व्हि. आर. पवार यांच्या नवीन शोरूमचे उद्घाटन सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला. यावेळी धाराशिव चे पोलीस अधीक्षक मा. रितू खोकर, अप्पर जिल्हाधिकारी मा. ज्योती पाटील, उपजिल्हाधिकारी महसूल मा. स्वाती शेंडे, तहसीलदार धाराशिव मा.डॉक्टर मृणाल जाधव, मुख्याधिकारी धाराशिव नगर परिषदेच्या मा. नीता अंधारे हे प्रमुख निमंत्रित होते तर रमेश पवार, सौ. सुलोचना पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रत्येकासाठी काही खास, संपूर्ण कुटुंबासाठी एकच विश्वास हे विचार घेऊन व्हि. आर. पवार यांनी



धाराशिव मध्ये भव्य फॅमिली फॅशन दालनाची सुरुवात करण्यात आली आहे. यामध्ये दैनंदिन वापरापासून ते सणासुदीला वापरणाऱ्या कपड्यापर्यंत तसेच लग्नबस्ता करिता साड्या, सूट शेरवानी, सुटिंग - शर्टिंग, तसेच किड्स करिता सर्व प्रकारचे व्हरायटी उपलब्ध असल्याचे पवार यांनी सांगितले.

या व्हि. आर. पवार यांच्या भव्य फॅमिली फॅशन दालनाला धाराशिवकर आणि परिसरातील नागरिकांनी एक वेळ अवश्य भेट द्यावे असे आवाहन अमर पवार, महेश पवार, गिरीश पवार यांनी केले आहे.

# समाज विज्ञान निष्ठ होण्यासाठी संस्कृतीची जोड आवश्यक : चंद्रकांत पाटील

## मराठा समाज सेवा मंडळाचा दसरा महोत्सव साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरात समाज अल्प असला तरी समाजाचे कार्य आदर्शवत असून समाज खऱ्या अर्थाने विज्ञाननिष्ठ व्हायचा असेल तर त्याला संस्कृतीची जोड देणे ही तितकेच आवश्यक आहे. असे मत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले.

छत्रपती शिवाजी प्रशालेतील राजर्षी शाहू सभागृहात मराठा समाज सेवा मंडळातर्फे आयोजित दसरा महोत्सव व वैचारिक सिमोल्लंघन आणि शिवतीर्थ पुरस्काराचे वितरण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे हे होते. याप्रसंगी आईशक्ती फाउंडेशनचे संस्थापक मोहन डांगरे संस्थेचे सचिव राजेंद्र शिंदे, खजिनदार महादेव गवळी, संचालक विनायकराव पाटील, नीलकंठ वाघचौरे, अशोक चव्हाण, प्रभाकर खंडाळकर, मंगेश जाधव, सुरेश पवार, अलका सुरवसे,आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी प्रस्ताविक संस्थेचे सरचिटणीस महेश माने यांनी केले.



पाटील म्हणाले समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षण सामाजिक जाणीव आणि सक्षम नेतृत्व महत्वाचे असून मराठा समाज सेवा मंडळाची त्या दृष्टीने होणारी वाटचाल कौतुकास्पद आहे. या संस्थेला प्रदीर्घ शैक्षणिक व सामाजिक वारसा लाभला असून जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन उत्तम विद्यार्थी घडविण्याचे कार्य संस्थेकडून होत आहे. ही खूप मोठी आनंदाची बाब आहे.

यावेळी अध्यक्षीय मनोगतात सपाटे यांनी मराठा समाज सेवा मंडळ आणि यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ या दोन्ही संस्थेच्या माध्यमातून आपण शिक्षणाची गंगोत्री समाजातील तळगाळाला लोकापर्यंत नेल्याचे सांगितले. तसेच आपण यशवंतराव चव्हाण आणि ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या विचारानुसार चालणारे यांचे पाईक असून जीवनाच्या शेवटपर्यंत शरद पवारांची साथ सोडणार नसल्याचे नमूद केले.

दरम्यान यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्यासह अमोल शिंदे, अनंत जाधव, मनीष केत, विनोद भोसले, वृक्षाली चालुक्य, मनोरमा सपाटे, मृण्मयी गवळी, पुनम काशीद,कल्पना कदम, श्रद्धा पवार, या समाजातील नूतन नगरसेवकांचा संस्थेच्या वतीने मंत्री पाटील यांच्या हस्ते शिवतीर्थ पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. नितीन मोटे,सुजाता जुगदार तानाजी माने, मधुकर पवार, मोहम्मद शेख, मंजुश्री पाटील, किशोर बनसोडे, उषा गोखळे, सुनिता निकम,अनिता माने, सीताबाई गायकवाड, दत्ता भोसले, यांच्यासह शिक्षक -शिक्षिकेतर कर्मचारी व समाज बांधव उपस्थित होते. सूत्रसंचालन सारिका महामुनी पंडित यांनी केले तर संस्थेचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सपाटे यांनी आभार मानले.

# मनोरमा महाभोंडल्यातून संस्कृती आणि स्त्रीशक्तीचा जागर



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा सोलापूर पश्चिम, मनोरमा साहित्य मंडळी सोलापूर तसेच मनोरमा बँक परिवार व मनोरमा मल्टी स्टेट परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मनोरमा महाभोंडला' हा पारंपरिक लोकसंस्कृतीचा जागर करणारा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मनोरमा सांस्कृतिक भवन, बेन्नूर नगर, नवीन आरटीओ कार्यालयाजवळील मनोरमा बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या परिसरात झालेल्या या कार्यक्रमाला महिला वगार्चा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दीपप्रज्वलन तसेच देवी आणि हत्तीचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या शेकडो महिलांनी हत्तीभोवती भोंडल्याचा फेर धरत ह्यऐलमा पैलमा 'पासून विविध पारंपरिक व आधुनिक देवीगीतांचे सादरीकरण केले. त्यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे आणि पारंपरिक संस्कृतीचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमात महिलांच्या स्वसंरक्षणासाठी तायक्वांदो व लाठी-काठीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. भारती विद्यापीठातील नेताजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींच्या समूहाने तायक्वांदोचे प्रात्यक्षिक सादर केले. तसेच मानस करकंटी व त्यांच्या विद्यार्थिनींनी लाठी-काठीचे प्रात्यक्षिक दाखविले. महिलांनी या प्रात्यक्षिकांना उत्स्फूर्त दाद दिली. लाठी-काठीसारख्या पारंपरिक कला आत्मसात करून महिलांनी स्वसंरक्षणासाठी सज्ज राहण्याबरोबरच भारतीय परंपराही जपली पाहिजे, असे अर्चना बर्डे यांनी सांगितले.

सध्याच्या डिजिटल युगात महिलांना कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) माहिती असणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर उत्तरा बर्डे यांनी महिलांना कृत्रिम बुद्धिमत्तेबाबत सोप्या भाषेत मार्गदर्शन करून जनजागृती केली.

**कर्तृत्ववान महिलांचा 'नवदुर्गा' म्हणून सन्मान**

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा 'नवदुर्गा' म्हणून सन्मान करण्यात आला. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, एकल महिला धोरण कार्यकारिणी महाराष्ट्र राज्य सदस्य, डॉ. प्रीती देशमुख, डॉ. संध्या रघोजी, डॉ. दिपाली गोरे, डॉ. अश्विनी धोंड, डॉ. प्राजक्ता पोपटानी, डॉ. वर्तिका अगरवाल, लॉन टेनिस राष्ट्रीय स्पर्धेतील विजेत्या संध्याराणी बंडगर आणि सामाजिक कार्यकर्त्या उमा देग्गीनाळ यांचा शाल, रोप, पुस्तके व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

डॉ. संध्या रघोजी यांनी मनोगतात वाचन संस्कृतीचे महत्त्व सांगत, मनोरमा महाभोंडल्याच्या माध्यमातून केवळ मनोरंजन नव्हे तर विचारांचा जागरही होत असल्याचे नमूद केले. ज्ञानेश्वरी देवकर म्हणाल्या, मनोरमा परिवार विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबवत आहे. डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते, खेळाडू तसेच बालकलाकारांचा सन्मान करत पारंपरिक पद्धतीने संस्कृतीचे जतन करणारा हा उपक्रम आदर्शवत आहे.

मनोरमा मल्टी स्टेटच्या अध्यक्षा शोभा मोरे म्हणाल्या, 'मनोरमा परिवार हा आईच्या नावाने उभा राहिलेला परिवार आहे. आईचा जागर करताना प्रेम, सन्मान आणि संस्कारांचा वसा पुढे नेण्याचा आमचा प्रयत्न आहे. नवीन पिढीला आपली परंपरा आणि संस्कृती समजावी, यासाठी विचार, संस्कृती आणि स्त्रीशक्तीचा जागर करण्याचा हा उपक्रम असल्याचे सांगितले. मनोरमा परिवाराच्या कार्याध्यक्ष अस्मिता गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले

कार्यक्रमात झटपट प्रश्नावली, एका शब्दावर गाणी अशा मनोरंजक उपक्रमांत महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. परिवारातील कर्मचाऱ्यांच्या मुली स्वरा शिंदे आणि अनुजा शेंडगे यांनी कला सादर करून उपस्थितांची दाद मिळविली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोरमा बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी शिल्पा कुलकर्णी यांनी केले. मनोरमा मल्टी स्टेटच्या मुख्य कार्यकारी अधिकारी कविता कुलकर्णी यांनी आभार मानले. विद्या भगरे-भोसले यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी संचालिका, डॉ. ऋचा पाटील, डॉ. मिताली मोरे, चाफा ग्रुपचे सदस्य तसेच मनोरमा परिवारातील कर्मचारी व महिला सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मनोरमा परिवारातील कर्मचारी व महिला सदस्यांनी परिश्रम घेतले.

# पंचनामे १०० टक्के पूर्ण; वस्तुस्थितीनुसार अहवाल सादर करा- जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्य शासनाने सोलापूर जिल्ह्यातील अकराही तालुक्यांत दुष्काळ जाहीर केल्यानंतर प्रशासनाला सरसकट पीक नुकसान पंचनामे करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार पंचनामे करण्याची कार्यवाही १०० टक्के पूर्ण झाली आहे. आता सर्व तहसीलदारांनी संबंधित तालुका कृषी अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन वस्तुस्थितीनुसार सरसकट पंचनाम्यांचा अहवाल सादर करावा, तसेच सुधारित अ, ब, क, ड प्रपत्रे भरून द्यावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले. दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पंचनाम्यांची माहिती अचूक व वस्तुस्थितीदर्शक असणे आवश्यक आहे. त्यामुळे महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करून पंचनाम्यांचे अहवाल आणि सुधारित प्रपत्रे विहित पद्धतीने पूर्ण करावीत, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

**डिजिटल क्रॉप सर्वेच्या कामाला गती द्या**

जिल्ह्यात डिजिटल क्रॉप सर्वे (पीक पाहणी) तपासणीचे कामही समाधानकारक नसल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी या कामाची गती वाढवून प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत. तसेच फार्मर आयडीसाठी प्रलंबित असलेली प्रकरणेही तात्काळ मार्गी लावावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक, कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, सर्व संबंधित उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी), तहसीलदार आणि तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते.

# पालक, शिक्षक आणि समाजाची मुलींना समजून घेण्याची जबाबदारी- प्रा. विशाल गरड

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** 'गुण म्हणजे गुणवत्तेचा एकमेव निकष नाही. पालकांनी मुलांना संपत्तीत मोजू नये; आपलं लेकरू हीच खरी संपत्ती आहे. मुलींशी मनमोकळेपणाने संवाद साधला, त्यांच्याशी आपुलकीने वागलो, तरच त्यांचं भावविश्व समजून घेता येईल,' असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते तथा लेखक प्रा. विशाल गरड यांनी केले.

जिजामाता कन्या प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, अकलूज यांच्या वतीने शंकरनगर येथील स्मृतिभवन येथे 'मुलींना समजून घेताना - पालक, शिक्षक व समाज' या विषयावर पालक मेळावा व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक व्यवस्थापन समितीच्या सभापती स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात प्रा. गरड यांनी उपस्थित पालक, शिक्षक आणि विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष तथा प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुनीता वाघ, स्थानिक व्यवस्थापन समितीच्या सदस्या मीनल धनंजय माने-देशमुख, उपप्राचार्य प्रा. तावरे आणि पर्यवेक्षक संतोष अनगळ उपस्थित होते.

**मुलांशी संवाद साधा, त्यांच्यावर विश्वास ठेवा!**

समाजात होत असलेले बदल, त्यांचा मुलांवर होणारा परिणाम, पालक व शिक्षकांची जबाबदारी आणि मुला-मुलींनी घ्यावयाची काळजी याविषयी प्रा. गरड यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. आज मुला-मुलींना पालक, शिक्षक आणि समाजाबद्दल काय वाटते, हे जाणून घेण्याचा प्रयत्न फारसा होत नाही. मुलांना केवळ गुणांच्या आधारे तोलले जाते. मात्र, गुणांपेक्षा त्यांच्यातील कौशल्ये, क्षमता आणि व्यक्तिमत्त्व विकासाला महत्त्व देणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.

पालकांनी स्वतः व्यसनांपासून दूर राहून मुलांसमोर आदर्श निर्माण करावा. मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावेत. विशेषतः मुलींशी मनमोकळेपणाने संवाद साधून त्यांच्या भावना, अडचणी आणि अपेक्षा समजून घ्याव्यात. मुलांकडून चुका झाल्यास त्यांना त्या सुधारण्याची संधी द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

मुलींचे आरोग्य जपण्यासाठी योग्य आहार आणि सुरक्षित वातावरण महत्त्वाचे आहे. मुलींना केवळ वाढवणे आणि त्यांना सक्षमपणे घडवणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे पालकांनी त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष द्यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**शिक्षकांप्रती आदराची भावना निर्माण करा!**

शिक्षकांच्या जबाबदारीविषयी बोलताना प्रा. गरड यांनी शिक्षकांवर असलेल्या शालाबाह्य कामांच्या वाढत्या ताणाबद्दल खंत



व्यक्त केली. समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असून, आज समाजाला परिवर्तन घडवणाऱ्या शिक्षकांची नितांत गरज आहे, असे ते म्हणाले.

विद्यार्थ्यांना शिस्त लावताना शिक्षकांना पालकांचे सहकार्य मिळणे आवश्यक आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिस्त लावण्याचा प्रयत्न केल्यास काही पालक शाळेत येऊन शिक्षकांशी अयोग्य वर्तन करतात. असे प्रकार टाळण्यासाठी पालकांनी शाळेत येताना प्रतिष्ठेचा किंवा अहंकाराचा आव न आणता शिक्षकांशी सहकार्याची भूमिका ठेवावी. विद्यार्थ्यांसमोर शिक्षकांविषयी आदराची भावना निर्माण करावी, असे आवाहन त्यांनी केले.

प्रतिकूल परिस्थितीत मुलींसाठी शिक्षणाची दारे खुली करणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून पालक आणि शिक्षकांनी मुला-मुलींवर प्रेम करावे व त्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी मदत करावी, असेही त्यांनी सांगितले.

**समाज हेच मुलांसाठी मोठे विद्यापीठ!**

मुलींच्या सुरक्षिततेबाबत समाजाची जबाबदारी अधोरेखित करताना प्रा. गरड म्हणाले की, मुलांसाठी गल्ली आणि समाज हेच मोठे विद्यापीठ असते. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडले, तर भावी पिढी सुजाण आणि जबाबदार बनेल. मोबाईल हा ज्ञान मिळविण्याचे प्रभावी साधन असला, तरी त्याचा गैरवापर नुकसानकारक ठरू शकतो. त्यामुळे पालकांनी मुलांना दिलेल्या सुविधांचा योग्य वापर करण्याची जाणीव करून द्यावी. मुलींनीही मोबाईलचा वापर शिक्षण, ज्ञान आणि यश संपादनासाठी करावा, असा सल्ला त्यांनी दिला.

**चेहऱ्यापेक्षा ज्ञानाचा मेकअप करा!**

विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना प्रा. गरड यांनी स्वतःचा स्वीकार करण्याचे आणि आत्मविश्वासाने जगण्याचे आवाहन केले. त्वचेचा रंग किंवा बाह्यरूप यापेक्षा ज्ञान, कर्तृत्व आणि व्यक्तिमत्त्व यांमुळे माणसाची खरी ओळख निर्माण होते. आईच्या उदरातून मिळालेला त्वचेचा रंग कोणत्याही दुसऱ्या रंगापेक्षा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसतो. त्यामुळे चेहऱ्याच्या मेकअपपेक्षा मनाचा आणि ज्ञानाचा मेकअप करा. सौंदर्यप्रसाधनांवर खर्च करण्याऐवजी पुस्तकांवर खर्च केला, तर यशाच्या दिशेने वाटचाल करणे अधिक सोपे होईल, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला.

मुलींनी कायद्याची माहिती करून घेत अन्यायाविरुद्ध आवाज उठवावा आणि वाईट प्रवृत्तींपासून स्वतःचे संरक्षण करावे. शिक्षणावर लक्ष केंद्रित करून बौद्धिकदृष्ट्या सक्षम व्हावे. जीवनातील निर्णय घेण्याचा अधिकार प्रत्येक मुलीला आहे; मात्र त्यासाठी स्वतःला सक्षम बनवणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

विवाहाचा निर्णय घेताना केवळ संपत्ती न पाहता मुलाचे ज्ञान, आरोग्य आणि स्वभाव यांना महत्त्व द्यावे. व्यसनाधीन व्यक्तींपासून सावध राहावे, कृत्रिम पेयांचे सेवन टाळावे आणि खोट्या प्रेमाच्या जाळ्यात अथवा स्तुतीच्या मोहात अडकू नये, असा मौलिक सल्लाही त्यांनी विद्यार्थिनींना दिला.

**मुलींच्या भावना समजून घेणे महत्त्वाचे!**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मुख्याध्यापिका सुनीता वाघ यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक, पालक आणि समाज यांच्यातील समन्वय महत्त्वाचा असल्याचे सांगितले. मुलींच्या भावनांचा आदर करून त्यांच्या स्वप्नांना योग्य दिशा देणे आवश्यक आहे. मुलींना सतत सूचना देण्यापेक्षा त्यांचे म्हणणे ऐकून घेणे अधिक महत्त्वाचे आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किरण सूर्यवंशी आणि प्रा. आर. आर. पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. संतोष अनगळ यांनी केले.

**स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी सावित्रीबाईंचा विचार घराघरांत पोहोचवा!**

समाजातील स्त्रीभ्रूणहत्येच्या गंभीर प्रश्नावर भाष्य करताना प्रा. गरड यांनी मुली मुलांपेक्षा कमी नाहीत, ही भावना समाजात रुजविण्याची गरज व्यक्त केली. आपल्या भाषणात त्यांनी शासकीय आकडेवारीचा दाखला देत गर्भातच मुलींची हत्या होण्याच्या घटनांबाबत चिंता व्यक्त केली. प्रत्येक घरात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा फोटो असावा आणि त्यांच्या विचारांचा अंगीकार केला जावा, असे आवाहन त्यांनी केले.

मुलींनी मोठी स्वप्ने पाहावीत, ध्येय निश्चित करावे आणि ते साध्य करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करावेत. आईच्या मायेची आणि वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे भविष्य घडविण्याचा निर्धार करावा, असे आवाहनही त्यांनी विद्यार्थिनींना केले.

# अकलूज येथील अकलाई देवी मंदिरात सिमोलंघन उत्साहात साजरा

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज परीसरात नागरिकांनी विजयादशमी निमित्त एकमेकांना आपट्यांची पान देत दस-याच्या शुभेच्छा दिल्या. ग्रामदेवता अकलाई देवी मंदिरात देवी भक्तांनी आई राजा उदो उदो आई अकलाईचं चांगभलंचा गजर करत सिमोलंघन उत्साहात साजरा केला. तर श्रीराम मंदिरात रावण दहन व अकलाईचे छबीना मिरवणुकीनंतर शारदीय नवरात्र उत्सवाची सांगता झाली.

शारदीय नवरात्रोत्सव निमित्ताने आज विजयादशमी दस-याची सायंकाळची श्री अकलाई देवीची आरती डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाल्यावर अकलाईदेवी मंदिराच्या परिसरात आराधी गोंधळी व भक्तगणांच्या



उपस्थितीत देवीच्या छबिन्याची मिरवणुक काढण्यात आली. देवीच्या छबिन्याने मंदिराची प्रदक्षिणा केली डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांनी शस्त्रपुजा करुन अश्वस्वारीने मंदिरास पाच प्रदक्षिणा पुर्ण केली. श्रीराम मंदिरात शमी झाडाच्या पुजानंतर सिमोलंघन करीत रावणाचे दहन केले. अकलाई देवीच्या छबीना मिरवणुकीनंतर रात्री अकलाई देवी मंदिरात निद्रावस्थेत जाऊन शारदीय नवरात्र उत्सवाची सांगता करण्यात आली. यावेळी माणिक मिसाळ, अण्णासाहेब शिंदे, दिपक पिंजारे, राहूल जाधव, दादा नामदास, संदिप कोकाटे, विकास शिंदे आदी उपस्थित होते.

# शहरातील विविध नालेचे, तसेच डी. पी रोडची आयुक्तांकडून पाहणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील विविध नालेचे, तसेच डी. पी रोडची पहाणी महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी युगंधर हॉस्पिटल परिसरातील नाला, डीपी रोड, मजरेवाडी येथील नाला, तसेच कुमठे गाव मड्डी वस्ती परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देऊन कामांचा आढावा घेण्यात आला.या पाहणीप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्री. संदीप करंजे, नगर अभियंता श्री. नीलकंठ मठपती, सार्वजनिक आरोग्य अभियंता श्री. व्यंकटेश चौबे, विभागीय अधिकारी श्री. प्रकाश सावंत, मुख्य आरोग्य निरीक्षक श्री. लोखंडे, आरोग्य निरीक्षक, नगर अभियंता कार्यालयातील कनिष्ठ अभियंता व सहाय्यक अभियंता तसेच नाल्यांच्या कामाशी संबंधित सल्लागार (कन्सल्टंट) आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.पाहणीदरम्यान नाल्यांची सद्यस्थिती, पाण्याचा निचरा, परिसरातील स्वच्छता तसेच रस्त्यांशी संबंधित कामांची पाहणी करण्यात आली. नाल्यांमधील अडथळे दूर करणे, पाण्याचा प्रवाह सुरळीत ठेवणे आणि नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबंधित विभागांना दिल्या.

सोलापूर शहरात सध्या पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेता नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने व जबाबदारीने वापर करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या पाहणीदरम्यान कुमठे गाव येथे पाणी पुरवठाचे दिवस असल्याने त्याठिकाणी पाहणी दरम्यान काही नागरिक पाण्याचे नासाडी करत असल्याचे निदर्शनास



आले.पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत असल्याचे निदर्शनास आले. यावेळी त्या परिसरातील पाच नागरिकांना प्रत्येकी दोनशे रुपये प्रमाणे दंड करण्यात आले.

या परिसरात नळजोडण्यांना तोट्या नसल्याचे आढळून आले. त्यामुळे नळांमधून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत असून, हे पाणी रस्त्यावर येत असल्याचेही दिसून आले. पाणीटंचाईच्या काळात अशा प्रकारे पाण्याचा अपव्यय करणे गंभीर बाब असल्याने संबंधित पाच जणांवर महानगरपालिकेच्या वतीने दंडात्मक कारवाई करण्यात आली.

शहरातील उपलब्ध पाणीसाठ्याचा योग्य वापर व्हावा आणि सर्व नागरिकांना आवश्यक पाणी उपलब्ध होण्यासाठी प्रत्येकाने पाण्याची बचत करणे गरजेचे आहे. नागरिकांनी आपल्या नळजोडण्यांना योग्य तोट्या बसवाव्यात, पाण्याचे नळ विनाकारण सुरू ठेवू नयेत तसेच पाणी रस्त्यावर वाहून जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही तपासणी करून नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे.

**पाणी जपून वापरण्याचे महापालिकेचे आवाहन**

सध्या शहरात पाणीटंचाईची परिस्थिती असल्याने नागरिकांनी पाण्याचा वापर केवळ आवश्यक कामांसाठीच करावा. पिण्याचे पाणी वाहन धुणे, रस्ते धुणे किंवा इतर अनावश्यक कामांसाठी वापरणे टाळावे. प्रत्येक नागरिकाने पाण्याची बचत करून महापालिका प्रशासनाला सहकार्य करावे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आवाहन केले सोलापूर महानगरपालिकेचे नागरिकांना आवाहन : पाणी ही अमूल्य नैसर्गिक संपत्ती आहे. नळांना तोट्या बसवा, पाण्याचा अपव्यय टाळा आणि पाणी जपून वापरा. पाण्याचा अनावश्यक वापर केल्यास नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

# उजनीतून भीमा नदीत पाणी सोडण्यास पालकमंत्री सकारात्मक- रणजितसिंह शिंदे

टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडण्यास पालकमंत्री सकारात्मक असून आगामी तीन ते चार दिवसात भीमा नदी काठच्या नागरिकांना पिण्यासाठी पाणी सोडले जाणार असून भीमा नदी मधील को.प.चे सर्व बंधारे भरून घेतले जाणार आहेत अशी माहिती जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष तथा भाजपा युवा नेते रणजीत सिंह शिंदे यांनी दिली आहे.

विशेष वृत्त सांगताना रणजीत शिंदे म्हणाले की वेणेगाव (टेंभुर्णी )येथे पदवीधर आणि शिक्षक मतदार संघातील भारतीय जनता पक्ष - महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी आयोजित केलेल्या मेळाव्याप्रसंगी जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार जयकुमार गोरे उपस्थित होते, याप्रसंगी त्यांना सध्याच्या अवर्षणग्रस्त दुष्काळी परिस्थितीमध्ये भीमा नदी मधील बंधारे कोरडे पडले आहेत, नदी काठावरील इंदापूर माळशिरस माढा पंढरपूर मंगळवेढा आदी तालुक्यातील शेकडो गावे आणि वाड्यावरस्त्यावर पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे, नदीवरून असलेल्या पाणीपुरवठा योजना बंद पडल्या आहेत व त्यामुळे हजारो नागरिक आणि पशुधन यांना पिण्यासाठी भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे म्हणून उजनीतून भीमा नदीत तातडीने पाणी सोडणे अत्यंत महत्त्वाचे आणि आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिले असता पालकमंत्री ना.गोरे यांनी तातडीने या मागणीस सकारात्मकता दर्शवून जलसंपदा मंत्री नामदार विखे पाटील यांचेशी तातडीने चर्चा करून आगामी तीन ते चार दिवसाच्या आत उजनीतून भीमा नदीत पाणी सोडले जाईल याबद्दल निश्चिंत रहा असे आश्वासित केले.

**भीमा नदीत पाच ते सहा टीएमसी पाणी सोडण्याचे नियोजन : जिल्हाधिकारी**

रणजीत शिंदे यांचे बरोबर माझी याबाबत चर्चा झालेली आहे ,सध्याच्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये (डिझास्टर सरकमस्टन्स) उजनीतून भीमा नदीत पिण्यासाठी पाणी सोडणे अत्यंत गरजेचे व आवश्यक आहे हे जाणून जलसंपदा मंत्री नामदार विखे पाटील यांना पत्र तयार केले असून त्यावरती पालकमंत्री नामदार जयकुमार गोरे यांनी देखील सही केलेली आहे व हे पत्र तातडीने जलसंपदा मंत्री महोदयांच्याकडे रवाना केले आहे. धरणातून भीमा नदीत पाच ते सहा टीएमसी पाणी सोडण्याचे नियोजन तयार असून जलसंपदा मंत्री महोदयांच्याकडून परवानगी येताच, सोलापूर जलसंपदा विभागास आदेश देऊन तातडीने कदाचित बुधवारी किंवा परवा गुरुवारी देखील भीमा नदीत पाणी सोडले जाईल हे निश्चित.... - **एस. कार्तिकेयन,** जिल्हाधिकारी सोलापूर